# “ मागणे ”

देवा. . .
तिला आता माझी
आठवण करून देऊ नकोस!
आणि
भेटलेल्या प्रत्येक ठिकाणी. . .
तिच्या मनाला नेऊ नकोस !
देवा...
ती, तिच्या सख्याच्या बाहूत विसावताना
माझं शल्य बोचू देऊ नकोस !
आणि
ती एकटी असताना
तिला माझा एकटेपणा जाणवू देऊ नकोस !
देवा . . .
तिला तिच्या संसारात इतकं रमंव
की माझं जग दाखवू नकोस !
आणि
मला कुण्यापदराने आधार दिला नाही. . .
म्हणून, तिचा पदर वाऱ्यावर उडवू नकोस !
देवा...
मी चितेवरी जळताना, धूर थोडा निघताना
डोळी तिच्या असावं पसरू नकोस !
आणि
पुढच्या जन्मी प्रेमासाठी तिच्या . . .
उदरात मला फुलवायला विसरू नकोस !

गणेश वि. कुलकर्णी
9881603251